पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८
मा. विधी समिती
कार्यपत्रिका क्रमांक : ५

**सभावृत्तांत**

दिनांक : ०६ / ०७ / २०१२ वेळ : दुपारी ३ :०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार, दिनांक - ०६ / ०७ / २०१२ रोजी दुपारी ३:०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेत खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा. प्रसाद शेट्टी - सभापती
२) मा. ननवरे जितेंद्र बाबा
३) मा. सुपे आशा रविंद्र
४) मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
५) मा. शितोळे शैलजा बाबुराव
६) मा. नेटके सुमन राजेंद्र
७) मा. विनोद जयवंत नढे
८) मा. आल्हाट धनंजय मुरलीधर

या शिवाय मा.सावंत - सह आयुक्त, मा.मुंढे - सहा.आयुक्त, मा.चाकणकर - प्र.नगरसचिव हे अधिकारी उपस्थित होते.

----------

उपस्थित सन्मा. सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दखल करुन घेणेत आले.

विषय क्र.४ :- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभागात वृक्षारोपणासाठी खड्डे खोदणे व पोयटामाती भरणेकामी येणा-या खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

विषय क्र.५ :- "सहाय्यक आयुक्त" पदाचे पदनाम बदलून "उप आयुक्त" - "प्रशासन अधिकारी" अभिनामाचे पदाचे पदनाम बदलून "सहाय्यक आयुक्त" करणेबाबत.

विषय क्र.६ :- महिला व्यायामशाळा व गरीब विद्यार्थ्यांकरिता अभ्यासिका बांधणेसाठी येणा-या खर्चास मान्यता देणेबाबत - मा.शैलजा शितोळे, मा.आशा सुपे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७ :- वॉर्ड क्र.१४ सद्‌गुरुनगर येथील नाल्याचे बांधकाम करणे (निविदा क्र.G४B /२५/१४/२०११-१२ ) या कामातून चोविसावाडी येथे नाल्याचे बांधकाम करणेबाबत - मा.धनंजय आल्हाट, मा.विनोद नढे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८ :- अ प्रभाग स्थापत्य विभागामधील वॉर्ड क्र.६ गणेशनगर येथील ताब्यात आलेल्या मनपा शाळेच्या जागेला सिमाभिंत बांधणे व स्थापत्य विषयक कामे करणे या कामांची जागा व स्वरुपामध्ये बदल करणेबाबत - मा.आशा सुपे, मा.शैलजा शितोळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.९ :- आया व वॉर्डबॉय यांना लाड कमिटीच्या शिफारशी लागू करणेबाबत - मा.सुमन नेटके, मा.आशा सुपे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१०:- अ प्रभाग स्थापत्य विभागामधील वॉर्ड क्र.६ गणेशनगर मधील स्थापत्य विषयक व इतर कामे करणेबाबत - मा.सुमन नेटके, मा.नितीन लांडगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.११:- क मुख्यालय वॉर्ड क्र.९,२३,२४,२५ व २७ साठी विविध म.न.पा. कार्यक्रमासाठी मंडप व्यवस्था व अनुषंगिक कामे करणेकामी येणारे सुधारित खर्चास मान्यता मिळणेबाबत - मा.जितेंद्र ननवरे, मा.आशा सुपे यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक ०१/०६/२०१२ व १५/०६/२०१२ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ४) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक :- २४ विषय क्रमांक :- १
दिनांक :- ०६/०७/२०१२ विभाग :- जकात
सुचक :- मा.जितेंद्र ननवरे अनुमोदक :- मा.धनंजय आल्हाट
संदर्भ :- मा. महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.जकात/१०/कावि/९९/२०१२, दि. १९/०३/२०१२

विषय :- पिंपरी चिंचवड महानगरपालिका जकात नियम २००१ चे अनुसुची १ व २ मधील दर समानिकरणाबाबत.

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- २५ विषय क्रमांक :- २
दिनांक :- ०६/०७/२०१२ विभाग :- प्रशासन
सुचक :- मा.जितेंद्र ननवरे अनुमोदक :- मा.धनंजय आल्हाट
संदर्भ :- मा. महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशासन/१/कावि/४५७/२०१२, दि. १८/०६/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

डॉ. श्री. उदय टेकाळे, सहा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार दिनांक २७/०८/२०१२ पासून १ वर्ष कालावधीकरीता मुदतवाढ

देणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- २६ विषय क्रमांक :- ३
दिनांक :- ०६/०७/२०१२ विभाग :- उद्यान
सुचक :- मा.विनोद नढे अनुमोदक :- मा.सुमन नेटके
संदर्भ :- मा. महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.उद्यान/१/कावि/८४/२०१२, दि. २७/०६/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्रादेशिक विज्ञानकेंद्र चिचवड येथे करावयाच्या उद्यान विषयक कामे करणेकामी र.रु.४४,५१,६२१/- ( अक्षरी र.रु.चव्वेचाळीस लाख एक्कावन्न हजार सहाशे एकवीस फक्त) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.</u>

ठराव क्रमांक :- २७ विषय क्रमांक :- ४
दिनांक :- ०६/०७/२०१२ विभाग :- स्थापत्य उद्यान
सुचक :- मा.शैलजा शितोळे अनुमोदक :- मा.जितेंद्र ननवरे
संदर्भ :- मा. महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/जा/कावि/४/२०१२, दि. ३/७/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभागात वृक्षारोपणासाठी खड्डे खोदणे व पोयटा माती भरणेकामी येणा-या र.रु.१०,२५,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- २८ विषय क्रमांक :- ५
दिनांक :- ०६/०७/२०१२ विभाग :- प्रशासन
सुचक :- मा.नितीन लांडगे अनुमोदक :- मा.आशा सुपे
संदर्भ :- मा. महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१अ/कावि/५०८/२०१२, दि. ३/७/१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

शासन निणर्याने "सहाय्यक आयुक्त" पदास लागू केलेल्या वेतनश्रेणीपेक्षा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील "प्रशासन अधिकारी" पदास वरिष्ठ वेतनश्रेणी लागू असून "उप आयुक्त" पदास लागू केलेल्या वेतनश्रेणीपेक्षा "सहाय्यक आयुक्त" पदास वरिष्ठ वेतनश्रेणी लागू आहे. " क " वर्ग महानगरपालिकांच्या आकृतीबंधामध्ये उपआयुक्त अभिनामाची पदे अस्तित्वात असून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये अशी पदे अस्तित्वात नसल्याने वेतन वा

इतर कोणत्याही बाबीमध्ये बदल न करता "सहाय्यक आयुक्त" पदाचे पदनाम बदलून "उप आयुक्त" व "प्रशासन अधिकारी" अभिनामाचे पदाचे पदनाम बदलून "सहाय्यक आयुक्त" असे करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- २९ विषय क्रमांक :- ६
दिनांक :- ०६/०७/२०१२
सुचक :- मा.शैलजा शितोळे अनुमोदक :- मा.आशा सुपे
संदर्भ :- मा.शैलजा शितोळे, मा.आशा सुपे यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्र.२७ मोरवाडी येथील कै.देऊबाई नारायण कापसे ऊर्फ नानी उद्यानामधील विरंगुळा केंद्राचे वरील मजल्यावर महिला व्यायामशाळा व गरीब विद्यार्थ्यांकरिता अभ्यासिका बांधणेसाठी येणा-या र.रु.२५,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ३० विषय क्रमांक :- ७
दिनांक :- ०६/०७/२०१२
सुचक :- मा.धनंजय आल्हाट अनुमोदक :- मा.विनोद नढे
संदर्भ :- मा.धनंजय आल्हाट, मा.विनोद नढे यांचा प्रस्ताव -

वॉर्ड क्र.१४ सद्गुरुनगर येथील नाल्याचे बांधकाम करणे या कामाची निविदा काढणेत आलेली आहे. सदर कामातून वॉर्ड क्र.१४ सद्गुरुनगर येथील नाल्याचे बांधकाम करणेत येणार आहे तथापि सदरचा भाग हा रेडझोन हद्दीत असलेने सदर भागात नाल्याचे बांधकाम करणे योग्य होणार नाही. त्यामुळे सदर काम करणे ऐवजी सदर निविदा कामातून चोविसावाडी येथील नाल्याचे बांधकाम करणे आवश्यक आहे. नाल्याचे बांधकाम नसल्याने सदर भागात दुर्गंधी परसत आहे. त्यामुळे विषयांकित निविदा क्र. G४B/२५/१४/ २०११ - १२ कामातून चोविसावाडी नाल्याचे बांधकाम करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ३१ विषय क्रमांक :- ८
दिनांक :- ०६/०७/२०१२
सुचक :- मा.आशा सुपे अनुमोदक :- मा.शैलजा शितोळे
संदर्भ :- मा.आशा सुपे, मा.शैलजा शितोळे यांचा प्रस्ताव -

वॉर्ड क्र.६ गणेशनगर येथील ताब्यात आलेल्या मनपा शाळेच्या जागेला सिमाभिंत बांधणे व स्थापत्य विषयक कामे करणे या कामांची निविदा क्र.जी४बी/६/६३/२०११-१२ अन्वये प्रसिध्द करणेत आली असून या कामासाठी जागा उपलब नसलेमुळे मा.नगरसदस्य यांचे

मागणीप्रमाणे या निविदा कामांमधून याच वॉर्डातील इतर स्थापत्य विषयक कामे करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ३२ विषय क्रमांक :- ९
दिनांक :- ०६/०७/२०१२
सुचक :- मा. सुमन नेटके अनुमोदक :- मा.आशा सुपे
संदर्भ :- मा.सुमन नेटके, मा.आशा सुपे यांचा प्रस्ताव -

यापूर्वी रुग्णालयात काम करणा-या आया व वॉर्डबॉय यांना घाणभत्ता मिळत होता. तो बंद केल्याचे समजले. वास्तविक रुग्णालयात आया व वॉर्डबॉय यांना ज्या प्रकारचे काम करावे लागते ते आरोग्याला घातक आहे. अनेक साथीच्या रोग्यांच्या देखभालीकामी मदत करावी लागते. अशा प्रकारे सदरचे काम व त्याचे स्वरुप लक्षात घेता सफाई कर्मचा-यां प्रमाणे त्यांचे काम असलेने रुग्णालयात काम करणा-या आया व वॉर्डबॉय या पदांना घाणभत्ता पुर्ववत सुरु करणेत यावा शिवाय लाड कमिटीच्या शिफारशी लागु करणेत याव्यात.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ३३ विषय क्रमांक :- १०
दिनांक :- ०६/०७/२०१२
सुचक :- मा. सुमन नेटके अनुमोदक :- मा.नितीन लांडगे
संदर्भ :- मा.सुमन नेटके, मा.नितीन लांडगे यांचा प्रस्ताव -

वॉर्ड क्र.६ गणेशनगर मधील ताब्यात आलेल्या जागेवर नविन शाळा इमारत बांधणे या कामाची निविदा क्र.जी४बी/६/३८/२०११-१२ अन्वये प्रसिध्द करणेत आलेली असून या कामासाठी जागा उपलब्ध नसलेमुळे मा.नगरसदस्य यांचे मागणीप्रमाणे या निविदा कामांमधून याच वॉर्डातील इतर स्थापत्य विषयक कामे करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ३४ विषय क्रमांक :- ११
दिनांक :- ०६/०७/२०१२
सुचक :- मा. जितेंद्र ननवरे अनुमोदक :- मा.आशा सुपे
संदर्भ :- मा.जितेंद्र ननवरे, मा.आशा सुपे यांचा प्रस्ताव -

क प्रभाग स्थापत्य विभागामार्फत क मुख्यालय वॉर्ड क्र.९,२३,२४,२५,२६ व १७ साठी विविध मनपा कार्यक्रमासाठी मंडप व्यवस्था व अनुषंगिक कामे करणेचे काम ठेकेदार मे.लालदीप कन्स्ट्रक्शन यांचे निविदा क्र.१/१५-२०११/१२ अन्वये चालू आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सार्वजनिक निवडणूक २०१२ साठी मा.आयुक्त यांचे आदेश क्र.निवडणूक/कावि/६/२०१२ दि.१८/०१/२०१२ अन्वये मतदान केंद्राचे व मतमोजणी केंद्राचे ठिकाणी फर्निचर व्यवस्था करणे व आवश्यकतेनुसार मंडप उभारणी करणे, बॅरिकेटींग

करणे इ. कामे संबंधित कार्यकारी अभियंता यांनी त्यांचेकडील चालू असलेल्या वार्षिक स्वरुपाचे कामातून करणेबाबत आदेश दिले आहे. त्यानुसार निविदा क्र.१/१५-२०११/१२ अन्वये चालू असलेल्या कामातून सार्वत्रिक निवडणूक २०१२ साठी निवडणूक निर्णय अधिकारी क्र.२, ८ व ९ साठी आवश्यक कामे करण्यासाठी सुधारीत अंदाजपत्रक तयार करणेत आलेले असून त्यासाठी मूळ कामाचा खर्च र.रु.७,४६,३००/- आणि निवडणूक कामासाठी खर्च र.रु.८,६०,०००/- असा एकूण सुधारित खर्च र.रु.१६,०६,३००/- इतका अपेक्षित आहे. त्यानुसार सदर कामासाठी मा.आयुक्त यांनी दिनांक २४/०१/२०१२ अन्वये मान्यता दिलेली आहे. सदर कामासाठी सुधारित र.रु.१६,०६,३००/- (वाढीव र.रु.८,६०,०००/-) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( प्रसाद शेट्टी )**
सभापती
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/ ९७९ /२०१२
दिनांक - ०७ / ०७ / २०१२ चे लगत

प्र. नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.